# ई - पोलीस पत्रिका

दि १२/०१/२०२१ अनु.क्र. ०८

## (अमरावती शहर पोलीसांची २०२० ची उद्दिष्टे)

- जागरूक व तत्पर पोलीस.
- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू

# भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

**१.क्रमांक :-पोआअ/पशा-१/ बालसंगोपन रजा-मेश्राम/१५०/२०२१ अमरावती शहर दि.०६/०१/२०२१**

**आदेश**

खालील नमुद महिला पोलीस कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्क्षविलेल्या कालावधीकरीता त्यांच्या मुलगा/मुलगीच्या संगोपनासाठी **विशेष बालसंगोपन रजा** शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक/संकिर्ण-२०१७प्र.क्र.२५/ सेवा-६/ दिनांक २३/०७/२०१८ मधील तरतुदीनुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावं व हुद्या | नेमणुक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्या करिता | मंजुर विशेष बालसंगोपन रजा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मपोउपनि.सोनाली मेश्राम | पो.स्टे. फ्रेजरपुरा | ०१ | पहिल्या अपत्या करिता | दि.१६.०१.२०२१ ते १६.०३.२०२१ पावेतो ६० दिवस |

## शिक्षा/विभागिय चौकशी/

**२.क्र.पोआअ/ विचौ-२/कसुरी/गैरहजर/आदेश/१५६/२०२१/अमरावती शहर दि. ०६/०१/२०२१**

**आदेश**

खालील पोलीस अमंलदार हे त्यांच्या वरिष्ठांना कुठलीही पूर्वसुचना न देता परस्पर असपले कर्तव्यावरुन स्वमर्जीने अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे.त्यांचा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मध्ये नियम क्र. ६३ चे तरतुदीनुसार खालील पोलीस अंमलदार यांचे अनाधिकृतपणे गैरहजर असल्याने कालावधी हा **असाधारण रजा (विनावेतन)** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | कालावधी | विनावेतन रजा एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | पोहवा/५६९ गोपाल जोंधळे | पो.मुख्या.अम.शहर | दि.१४.११.२०२० ते १८.११.२०२० पर्यंत एकुण ०५ दिवस गैरहजर | ०५ दिवस विनावेतन रजा |
| २ | पोशि/१६८४ शरद जाधव | पो.मुख्या.अम.शहर | दि.१७.११.२०२० ते २२.११.२०२० पर्यंत एकुण ०६ दिवस गैरहजर | ०६ दिवस विनावेतन रजा |
| ३ | पोशि/२५८ आकाश हमंद | पो.मुख्या.अम.शहर | दि.२०.११.२०२० ते | ०६ दिवस विनावेतन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | २५.११.२०२० पर्यंत एकुण ०६ दिवस गैरहजर | रजा |

**३.क्र-पोआअ/विचौ-१/कसुरी/अंआ/पोशि-१६९४-अश्वीन/८३८५/अमरावती शहर दिनांक २४/१२/२०२०**

**आदेश**

**कसुरदाराचे नाव :-** पोशि/१६९६ अश्वीन पवार,नेमणुक मोटर परीवहन विभाग अमरावती, शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोशि/१६९६ अश्वीन पवार याने दिनांक २२/०७/२०२० रोजी २०/०० रोजी पो.स्टे.खोलापुरी गेट येथील नियंत्रण कक्ष मोबाईलवर चालक म्हणुन ड्युटी करुन २०/०० वा. पो.ना/१२१३ विजय बोराडे यांना चार्ज दिला व त्यानंतर मात्र कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे कर्तव्यावरुन गैरहजर राहीले नमुद पो.कॉ हे दिनांक २३/०७/२०२० रोजी सकाळी ०८.०० वा. ड्युटी होती. परंतु तुम्ही गैरहजर राहील्याने मो.प.विभाग अम.शहर येथील स्टेशन डायरी मध्ये सा.ना.क्र. १५/२० वर १४.४५ वा. दिनांक २३.०७.२०२० रोजी नोंद घेण्यात आलेली आहे. सदर कर्मचारी दिनांक २२.०७.२०२० चे २०.०० वा. नंतर सतत दि. ३१.०७.२०२० पर्यत कर्तव्यावर गैरहजर राहीले आहे. दरम्यान मा.पोलीस अधिक्षक,अमरावती ग्रामीण यांचेकडुन माहीती मिळाली कि, तुम्ही व तुमचे मित्र यश वानखडे हे दि. २२.०७.२०२० रोजी २०.३० वा. दरम्यान मालखेड रेल्वे येथे मावशी सौ. सुनिता किसन राठोड यांचे घरी गेले व त्यांचे शेजारी राहणारे मारोती रविन्द्र मेश्राम यास दारुचे नशेत शिवीगाळ करुन मारहाण केली. मारोती मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. चांदुर रेल्वे अमरावती ग्रामीण येथे अप.क्र. २०८/२०२० कलम ३२३,२९४,४५२,३४ भादविचा गुन्हा दाखल झाला आहे. तुम्ही दिनांक २२.०७.२०२० रोजी २२.०० वा. ड्युटी पुर्ण करताच गुन्हा करण्याचे उद्देशाने गुन्हेगार साथीदार यास सोबत घेवुन पो.स्टे.चांदुर रेल्वे अमरावती ग्रामीण यांचे हद्दीत जावुन गुन्हा केला. यावरुन तुम्ही गुन्हा करण्याची पुर्व नियोजीत योजना असल्याचे **प्राथमिक चौकशीत निष्पण झाले.** तुम्ही दिनांक २२.०७.२०२० रोजी गुन्हा केल्यानंतर तुम्हांला पोलीस खात्यातील नौकरीची आवश्यता नाही. अशा वृत्तीने कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता दि.२३.०७.२०२० ते ३१.०७.२०२० एकुण ०९ दिवस वरिष्ठांना कोणतीही पुर्व परवानगी न देता बेजबाबदार पणे गैरहजर राहीले.सदरची बाब शिस्तबध्द पोलीस खात्याला अशोभनिय असुन अतिशय गंभीर आहे. अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी गंभीर कसुरी केल्याने तुमच्या या बेशिस्त,बेजबाबदार व गैरवर्तन कसुरीबद्दल तुम्हांस मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **देय वार्षीक वेतन वाढ (दोन) २ वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदरची नोटीस आपण दिनांक १५/१०/२०२० रोजी स्विकारुन त्यावर आपले स्पष्टीकरण वेळेवर सादर न करता उशीराने दि.०८/१२/२०२० रोजी स्पष्टीकरण सादर केले आपण सादर केलेले स्पष्टिकरणाचे बारकाईने अवलोकन केले असता ते समाधानकारक दिसुन आले नाही. म्हणुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेली प्रस्तावित शिक्षा खालील आदेशामध्ये कायम ठेवण्यात येवुन अंतिम आदेश निर्गमीत करीत येत आहे.

**<u>अंतिम आदेश</u>**

उपरोक्त कसुरी प्रकरणी _पोशि/१६९६ अश्वीन पवार,नेमणुक मोटर परीवहन विभाग अमरावती, शहर. यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार (दोन ) २ **वर्षाकरीता (परिणामा न होता) रोखण्याची शिक्षा देण्यात येत आहे.**

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांना योग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता .

# वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

**सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्याव्यात.**

| अ.क्र. | हुददा | ब.न. | अधि.व कर्म.यांचे नांव | नेमणुक पो.स्टे | वाढदिवसाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोहवा | ६९५ | राजेंन्द्र डोंगरे | पो.स्टे.राजापेठ | १२/०१/२०२१ |
| २ | मपोशि | ४०१ | अस्मिता नन्नावरे | शवाशा पुर्व | १२/०१/२०२१ |
| ३ | पोशि | १५४६ | निलेश बावनथडे | पो.स्टे.बडनेरा | १२/०१/२०२१ |

**(अशोक लांडे)**
प्र.सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर करिता

प्रत,

पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक ,आस्थापना शाखा/सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती व आवश्यक कार्यवाही करीता.